Vol 5 Issue 12 Sept 2016

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 12 | September - 2016

Review Of Research

# सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण : एक अभ्यास

प्रा. डॉ. साळवे जे. एम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर ता. बारामती जि-पुणे.

## प्रास्ताविक

औद्योगिक विकास हा देशाच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा मुद्दा आपणास लक्षात येतो. औद्योगिक क्रांतीचा प्रभाव पडल्याने निर्मीत भांडवलशाहीच्या दोषतून इंग्लंडमध्ये सहकार चळवळीचे आगमन झाले. या चळवळीचा "रॉशडेल" हा प्रणेता होता. सहकाराची जी तत्वे 20 व्या शतकाच्या मध्यापर्यत मान्य होती ती तत्वे "रॉशडेल" या नावाने परिचित होती, या तत्वांमध्येच सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण एक महत्त्वाचे तत्व होते. सहकाराचा पाया मजबूत करण्यासाठी चळवळीतील कार्यकर्त्यांना व सभासदांना, कर्मचारी वर्गाला तसेच इतर वर्गाला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे सहकारी संस्थेचे सभासद, कर्मचारी, सहकारी संस्थेचे प्रशासन प्रभावी होण्यासाठी तसेच सहकारी संस्थांना चांगले नेतृत्व देण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे सहकारी संस्थाना बळकटी येणार आहे. सहकाराची मुळ संकल्पना, उद्देश, महत्व व सहकारी चळवळ कोणासाठी हे जोपर्यंत संबधितांना माहित होत नाही तोपर्यत सबधितांची भूमिका ही प्रभावी ठरणार नाही, म्हणूनच सहकारामध्ये शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. म्हणूनच सहकारामधील शिक्षण आणि प्रशिक्षण याचा अभ्यास करणे उचित ठरेल.

## सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची संकल्पना किंवा व्याख्या:-

1) "सहकारी शिक्षण प्रशिक्षण म्हणजे संघटीत होणे, एकीची भावना निर्माण होणे, लाचलुचपतीला प्रतिबंध घालणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, लोकशाही पध्दतीने काम करणे तसेच चांगल्या पध्दतीने व्यवस्थापण करून संस्था व चळवळीला बळकटी आणण्यासाठीची माहीती देणे त्याला सहकार शिक्षण प्रशिक्षण म्हणता येईल". अशी सर्वसाधारणपणे व्याख्या करता येईल.

2) वैटकिन डब्लू. पी - 'सहकार शिक्षण म्हणजे शैक्षणिक कार्यक्रम राबविणारी चळवळ, हे विधान केल्यास तितकेच खरे व महत्वाचे ठरते ते असे सहकार म्हणजे आर्थिक कार्यक्रम राबविणारी शैक्षणिक चळवळ होय'.



3) इडिसन- "सहकारी शिक्षणामुळे जीवनविषयक असा दृष्टीकोन निर्माण करणे,की ज्यामुळे संघटित होण्याची,सहकार्याची व सहयोगाची भावना वाढीस लागते. परिणामी व्यक्तीचा व समाजाचा सर्वांगिण फायदा होतो.

शिक्षण आणि प्रशिक्षण अभावी संस्थांची स्थिती याचा विचार केला तर आपणास काही विधाने लक्षात घ्यावी लागत. या विधानावरून आपणास असे समजते की सहकारी संस्थांमध्ये शिक्षण व प्रशिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे.

विधाने :- 1) "विकसनशील देशामध्ये सहकारी संस्था या घाई घाईने स्थापन केल्या जातात व सवडीने दिवाळखोरीत काढण्यात येतात म्हणून शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज आहे"

2) "साहकारामुळे मिळणा-या सोयी व सवलती यांचा प्रचार झाला, परंतु कर्तव्यता याकडे दुर्लक्ष झाले".

**प्रशिक्षणाची गरज:-** सहकार ही समान उद्दिष्टयनुरूप एकत्र येवून कार्य करण्याची चळवळ आहे. यामध्ये स्वावलंबन, सामाजिक हित, नैतिकता, सेवा तत्व, परस्पर सहकार्याचे तत्व सामावलेले आहे. सहकार चळवळीमध्ये काम करणा-यांनाच सहकार चळवळीची पुरेशी माहीती नसते. सहकाराची चळवळ ही आर्थिकदृष्या प्रगती करीत असलेल्या देशासाठी म्हत्त्वाची आहे. दुस-या महायुध्दानंतर जागतिक पातळीवरील अनेक देश इंग्लडच्या गुलामगिरीतून मुक्त झाले. या सर्व देशात विकासासाठी सहकार हे माध्यम स्वीकारले गेले. त्यास भारत देशाचा समावेश आहे. भारतात सहकार चळवळ रूजली, फोफावली सहकाराच्या या चळवळीकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होता पण सहकारची तत्वे पत्येक कार्यकर्त्यांने आत्मसात केली असे म्हणता येणार नाही. म्हणूनच सहकार प्राशिक्षणाची गरज निर्माण होते.

## सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा विकास

सहकार चळवळीचे यश या चळवळीत कार्य करणा-या सभासद संचालक व नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. ही कार्यक्षमता पर्यायाने नोकरवर्गाला मिळणा-या सहकारी शिक्षणावर अवलंबून आहे. ज्यामुळे सहकार चळवळीत सहकार शिक्षणास फार महत्त्व आहे. सहकार चळवळीची कामे करणारे अनेक कार्यकर्ते सभासद अशिक्षित व सहकारी चळवळीतबावत अज्ञानी असल्याने त्यांना योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. सहकारी शिक्षण हा सहकार चळवळीचा एक अविभाज्य भाग मानला पाहिजे. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा विकास हा पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येतो.

**1) अधिकारी यांनी जी माहिती दिली हेच शिक्षण:-** सहकारी चळवळीच्या सुरवातीच्या काळामध्ये सहकारी खात्याच्या अधिका-यांनी दिलेली माहिती हेच सहकारी शिक्षण समजले जात असे अर्थात अधिका-यांच्या मदतीने काही ठिकाणी

माहिती देण्यासाठी कार्यकर्त्यांना एकत्र बोलवण्याची पध्दत होती .

**2) 1912 पासून सहकारी शिक्षण वर्ग :-** सहकारी संस्थामधील नोकरवर्गाला शिक्षण देण्याची गरज असल्याने गोपाळकृष्ण गोखले यांनी काही सहकारी चळवळीतील व्यक्ती तसेच सहकारी अधिकारी यांच्या मदतीने 1912 पासून सहकारी शिक्षण वर्ग सुरू केले हे वर्ग सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या विद्यमाने भरविले जात होते . मुंबईमधील गिरणी कामगारांच्या सोसायटीच्या सभासदांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी बरेच वर्ग भरविले . सहकार खात्यानेही या वर्गांना शक्यतोपरी सर्व सहाय्य केले .

**3) प्रशिक्षणासाठी इन्स्टिट्युटची स्थापना :-** 1917 मध्ये राजबहादूर एस . एस तालमाकी यांनी प्रांतिक सहकारी परिषदेपुढे "सहकारी संस्था व त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य" या विषयावर एक निबंध वाचून दाखविला या निबंधातील विचारांना अनुसरून प्रशिक्षणासाठी इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यासंबंधी एक ठराव परिषदेने पास केला . त्यासबंधी आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठी एक समिती नेमली या समितीच्या शिफारशीनुसार दि . 13 जुलै 1918 रोजी मुंबई सेंट्रल कोऑपरेटिव्ह इन्स्टिटयुटची स्थापना झाली आणि 1912 च्या सहकार कायद्याखाली नोंदविण्यात आली .

**4 )प्रशिक्षणासाठी सहकारी विद्यालयाची स्थापना :-** 1922 मध्ये शिक्षण व्यवस्थेसाठी एक स्वतंत्र 'असिस्टंट रजिस्टार' नेमण्यात आला . 1923 मध्ये मुंबई येथे पगारी सेक्रेटरी नेमून त्यांच्याकडे प्रचार व तपासणीची जबाबदारी सोपविली 1925 मध्ये प्रांतिक सहकारी कायदा मंजूर झाल्यानंतर या कायदयानुसार इन्स्टिटयूटला मान्यता देण्यात आली . 1926 मध्ये "सेंट्रल एज्युकेशन बोर्ड "स्थापन करण्यात आले . या बोर्डाकडे शिक्षणवर्गासाठी अभ्यासकम ठरविणे, परीक्षा घेणे तसेच यशस्वी उमेद्वारांना पदवी प्रमाणपत्र देणे इत्यादी कामे सोपविण्यात आली .

1927 मध्ये जिल्हा व विभागीय प्रशिध्दी अधिकारी नेमण्यात आले . शिक्षण कार्यासाठी केवळ सेक्रेटरीचे वर्ग चालविणे पुरेसे नाही असे वाटल्यामुळे आणि सहकारी शिक्षणाची सर्वत्र मागणी होऊ लागल्यामुळे जुलै 1928 मध्ये इन्स्टिटयूटने पुणे, सुरत व धारवाड येथे सहकारी विद्यालये सूरू केली . शक्य असेल त्या ठिकाणी ही विद्यालये स्थानिक सहकारी कार्यकर्त्याच्या चालकत्वाखाली सूरू ठेवण्याचे धोरण इन्स्टिटयूटने ठेवले होते .

**5) सहकारी शिक्षण कार्याची जबाबदारी सहाकार खात्याकडे:-** 1930 च्या सुमारास जागतिक मंदीचा परिणाम सहकारी संस्थाच्या व्यवहारावर मोठया प्रमाणावार झाल्याने सहकारी शिक्षणाची मागणी पुन्हा कमी होऊ लागली . 1931 मध्ये विद्यार्थ्यांच्या अभावी सुरत येथील विद्यालय बंद करावे लागले प्रसिध्दी अधिका-यांच्या जागा काही ठिकाणी कमी केल्या . 1926 मध्ये केंद्र सरकारने सहकारी शिक्षण कार्यासाठी 15 लाख रूपये मंजूर केले आणि मुंबई प्रांताकडे जवळपास 2 लाखांवर रक्कम या कार्यासाठी सोपविली या मदतीमुळे सहकारी शिक्षण कार्य स्वत :कडे घेण्याचे सहकारी खात्याने ठरविले .

## सहकार शिक्षण व प्रशिक्षण केंद्राची संख्या

राज्यामध्ये सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण विद्यालयाची स्थापना पुढील प्रमाणे करण्यात आली आहे .

| अ . क | प्रशिक्षण केंद्राचे ठिकाण | स्थापना |
|---|---|---|
| 1 | पुणे | 1 जुलै 1928 |
| 2 | जळगाव | 1 जानेवारी 1957 |
| 3 | मुंबई | 1 ऑगस्ट 1957 |
| 4 | औरंगाबाद | एप्रिल 1958 |
| 5 | नागपूर | 1 ऑक्टोंबर 1958 |
| 6 | कोल्हापूर ,अमरावती | 1 जुलै 1959 |
| 7 | नाशिक | 1 जुलै 1961 |
| 8 | अहमदनगर | 15 जुलै 1963 |
| 9 | सांगली | 1 जुलै 1963 |
| 10 | लातूर, अकोला | 1 जानेवारी 1965 |
| 11 | चंद्रपूर | जानेनारी 1972 |

एकूण अमरावती व अकोला सोडून 11 सहकारी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली तसेच 14 जून 1947 रोजी पुणे आणि 1972 मध्ये नागपूर येथे सहकार प्रशिक्षण महाविद्यालये सुरू करण्यात आली . त्यामुळे आज महाराष्ट्रात 13 सहकार प्रशिक्षण महाविद्यालय आणि कै . वैकुंठलाल मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था पुणे हे सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार व प्रतिनिधीचे काम करीत आहे .

**सहकारी संघाची भूमिका :-** महाराष्ट्रात राज्य सहकारी संघाने आपल्या प्रशिक्षण यंत्रणेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सहकारी संस्थाच्या पदाधिकारी, सभासद, संचालक, सेवक इत्यादी करिता फार मोठे शैक्षणिक प्रकल्प राबविले आहेत . त्यामध्ये "राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ" यांच्या मार्फत गोदाम प्रशिक्षण कार्यकम, सेवा सहकारी संस्थांमधून कार्य करणा-या सभासदांना फिरत्या पथकाद्वारे गोदाम व्यवस्थापनाचे शास्त्रशुध्द तांत्रिक प्रशिक्षण तसेच दि . 15सप्टेंबर 1999 पासून 18000 प्राथमिक सेवा सहकारी संस्थांमधून काम करणा-या 12000 गटसचिवांना दोन दिवसांचे प्रशिक्षण देवून त्यांना अद्ययावत ज्ञान उपलब्ध करून देणे हा कार्यकम हाती घेतलेला आहे .

सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता :- स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योतर काळात सहकार चळवळीशी सबंधीत घटकांना शिक्षण-प्रशिक्षण देवून चळवळ सुदृढ पायावर उभी रहावी, असा प्रयत्न झालेला आहे . कारण सहकार ही चळवळ आहे . ही चळवळ साध्य नसून विकासाचे, प्रगतीचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेचे साधन आहे . सहकाराच्या शिक्षण प्रशिक्षणाची आवश्यकता पुढीलप्रमाणे सांगता येईल .

1) आर्थिक गैरव्यवहार टाळणे :- सहकार चळवळ ही विकासाची चळवळ आहे पण या चळवळीतून स्वत:चा विकास करावयाचा नसतो समाजाचा विकास करताना संस्थेच्या माध्यमातून सभासदांचा आर्थिक विकास ही संकल्पना विचारामध्ये घेतली जाते . सहकारी संस्थांची स्थापना करून संस्थांच्या आर्थिक व इतर संसाधनाचा दुरूपयोग करणे, गैरव्यवहार करणे, अनावशक खर्च टाळणे इत्यादीवर भर देण्याची गरज आहे परंतु होताना दिसत नाही . म्हणूनच संस्थेच्या आर्थिक साधनांचा गैरव्यवहार टाळण्याकरीता, सामाजिक संपत्तीचा नियोजित पध्दतीने विकास करून घेण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक असते .

2) संस्थांच्या व्यस्थापनात कार्यक्षमता आणणे :- सहकारी संस्था या फक्त अल्पदराने कर्जपुरवठा करण-या संस्था नसून विविध प्रकारच्या सहकारी बॅका, पतपुरवठा संस्था, खरेदी विक्री संस्था, बहुउद्देशीय संस्था, दुग्धविकास व कुकुटपालन सहकारी संस्था, ग्राहक सहकारी भंडारे, ओद्योगिक सहकारी संस्था, ग्रहनिर्माण संस्था इत्यादी प्रकारच्या संस्था आहेत या संस्थांचे व्यवस्थापन चांगले व्हावे, प्रशासनात सुसुत्रता असावी, संस्थेचे रेकॉर्ड अद्यायावत रहावे, लेखापरीक्षण नीट व्हावे व संस्था प्रभावीपणे चालाव्यात यासाठी संस्थेच्या सर्वच घटकांना शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे .

3) जबाबदार व सुसंस्कृत सभासद निर्माण करणे :- भारतामध्ये सहकार चळवळ ही सरकारच्या प्रयत्नाने व पाठिंब्याने सुरू झाली आहे . ही चळवळ कायमस्वरूपी सहकार चळवळ रहावी असे कोणाही व्यक्तीस वाटणार नाही असे नव्हे, ही चळवळ सभासदांची, कार्यकर्त्यांची चळवळ व्हावी आणि त्यातून सुसंस्कृत व जबाबदार सभासद निर्माण व्हावेत या उद्देशातून सहकार चळवळीच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे .

4) परस्परांमध्ये विश्वासाची भावना निर्माण होते :- परस्परांमध्ये विश्वासाची भावना हे सहकाराचे उद्दीष्टये सांगितले आहे सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा प्रशिक्षित व्यक्ती व कार्यकर्ते यांच्यामध्ये एकमेकांबद्दल परस्पर संबध आणि विश्वासाची भावना निर्माण होते, असे तज्ञांचे मत आहे . शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे कार्यकर्ते हे चांगले सभसद होतात आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून समाजाची चांगली सेवा करू शकतात . म्हणून सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक आहे हे आपणास मान्य करावे लागेल .

5) सहकार क्षेत्रचा निकोप विकास :- लोकशाही हे सहकाराचे महत्वाचे तत्त्व मानले जाते म्हणून सभासदातून सक्षम संचालक सक्षम निवडले जातात . आर्थिक प्रगती, व्यवस्थापन इत्यदी बाबतचे धोरण सहकारात वृध्दिगत करणे आवशक आहे . संचालक मंडळाच्या कार्यपध्दतीवर नियंत्रण ठेवणे, आर्थिक व्यवहार तपासणे या करिता सभासदांना शिक्षण आणि प्रशिक्षण आवश्यक आहे . सहकार शिक्षण प्रशिक्षणामुळे सहकारातील गटबाजी, स्वाहाकार, भ्रष्टाचार यापासून संस्था मुक्त करता येतील .

6) सहकार तत्व समाजात रूजविणे :- चळवळीचा उगम, सहकारी चळवळीच्या विकासाची संकल्पना, सहकारी चळवळीचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व, व्यवस्थापन, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची भूमिका तसेच सहकाराचे तत्व इत्यादी बाबतीतच्या माहितीचे शिक्षण आणि प्रशिक्षण सहकार चळवळीतील संबंधीत घटकांना दिल्यास सहकाराची भूमिका व सहकाराचे तत्व समाजात रूजण्यास मदत होईल . म्हणून सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण गरजेचे आहे .

7) सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन :-सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे सहकारी संस्थांच्या संदर्भातील पूर्ण माहिती आणि या चळवळीची भूमिका कळते . त्यामुळे ही चळवळ आर्थिक विकासाचे साधन आहे . या साधनाद्वारे परिवर्तन घडवून आणता येते, ही जाणीव कार्यकर्त्यात रूजली की, कार्यकर्ते स्वत: सहकारी संस्थांच्या स्थापनेमध्ये निस्वार्थवृत्ती,सामाजिक हित, कार्यक्षम संस्था, चांगले व्यवस्थापन या उद्देशातून कार्य करू शकतात .

8) स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे :- सहकार चळवळ ही लोकशाही चळवळ आहे . लोकशाही पध्दतीने स्वावलंबनाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न या चळवळीमुळे होतो . ही चळवळ विशिष्ट व्यक्तीच्या इशा-यावर किंवा लहरीवर चालते, असा सतत आरोप करण्यात येतो . सहकाराशी संबंधीत घटकांना जर उचित पध्दतीने शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन त्यांना सहकाराच्या माध्यमातून स्ववलंबनाचे शिक्षण दिल्यास सभासदांमध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण होण्यास मदत होते म्हणून सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षणाची गरज सभासदांना आहे .

9) अनावश्यक खर्च टाळला जातो :- सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे सहकारी संस्थांमध्ये होणारा अनावश्यक खर्च टाळणे शक्य होईल . सहकारी संस्थामध्ये अनेक प्रकारचा खर्च व्यवस्थापनासाठी करण्यात येतो असा खर्च आवश्यकतेनुसार करण्यास हरकत नाही पण सहकारी संस्थांमध्ये आवश्यक खर्चापेक्षा अनावश्यक खर्चानाच प्राधान्य देण्यात येते . हा खर्च अनुत्पादक स्वरूपाचा असतो . त्यामुळे अनावश्यक खार्च टाळण्यासाठी सहकार शिक्षण आणि प्रशिक्षाची गरज असते .

शिक्षण आणि प्रशिक्षण कोणासाठी असावे .

सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे संबंधितांचा दृष्टीकोन बदलण्यास मदत मदत होईल . सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण खालील घटकांना दयावे . या घटकांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण दिल्यास चळवळीचे व संस्थेचे भवितव्य उज्ज्वल होण्यास मदत होते .

1) सहकारी संस्थांचे सभासद व संचालक :- सहकारी संस्थाचे भवितव्य, विकास हा सहकाराच्या ध्येय धोरणांशी प्रमाणित असलेल्या सभासद व संचालकावर अवलंबून असतो, कारण सहकारी संस्थांचे सभासद हे आर्थिकदृष्टया कमकुवत असतात . त्यांनी त्यांच्या कमी उत्पन्नातून संस्थेचे भांडवल उभे केलेले असते . म्हणून याचा विचार इतर सभासदांनी आणि निवडून दिलेल्या संचालकांनी करणे आवश्यक असते . सहकराचे प्रशिक्षण या वर्गाला देणे आवश्यक आहे . सहकार चळवळ ही सभासद आणि संचालकांच्या पायावर उभी आहे . हा पाया जेवढा मजबूत राहिल तेवढे चळवळीचे आणि संस्थेचे भवितव्य उज्ज्वल आहे .

2) सहकारी संस्थेचे कर्मचारी वर्ग :- कर्मचारी वर्ग हा सहकारी संस्थेचे प्रत्यक्ष व्यवस्थापन पहात असतो . हा वर्ग प्रशिक्षित असेल तर शासनाशी होणारा पत्रव्यवहार, संस्थेच्या अर्थिक व्यवहारांच्या उचित नोंदी, लेखापरीक्षण, सरकारचे सहकार्य प्राप्त करणे, अनावश्यक खर्चाला पायबंद घालणे, विकासाच्या विविध योजना राबविण्याचे काम प्रभविपणे करू शकतो . म्हणून प्रत्यक्ष कार्य करणा-या कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे .

3) सरकारच्या सहकार खात्यातील कर्मचारी व अधिकारी :- शासनाने सहकार खात्याच्या व्यवस्थापनासाठी सहकार मंत्रालयाची निर्मिती केली आहे . या खात्यामध्ये काम करणा-या अधिकारी आणि कर्मचारी वर्गास सहकाराची पुरेशी माहिती नसल्यामुळे ते टोलवाटोलवीची उत्तरे आपणास देतात . आपणासही माहिती नसते आपण नवीन असतो, म्हणून मंत्रालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे .

 Volume - 5 | Issue - 12 | September - 2016

**4) निबंधक कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी :-** सहकारी संस्थांशी प्रत्यक्ष संबंध असलेले कार्यालया म्हणजे निबंधकाचे कार्यालय या कार्यालयाची भूमिका अतिशय महत्वाची आहे . म्हणून या खात्यातील प्रत्येक कार्मचारी आणि अधिकारी यांना सक्तीने प्रशिक्षण देण्याची गरज आहे . संबंधीत घटकांना माहिती देण्याचा सकारात्मक दृष्टीकोन विकसित होण्यावर भर देणे आवश्यक आहे .

**5) स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी :-** ग्रामिण भागातील सहकारी संस्था आणि ग्रामिण राजकारण यांचा अतिशय जवळचा संबंध आहे . ग्रामपंचायत सभासद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे सभासद, नगरपालिकेचे सभासद यांना किमान 15 दिवसाचे सक्तीचे सहकार विषयक प्रशिक्षण देण्यात येणे गरजेचे आहे . त्यामुळे सहकारविषयक व्यवस्थापनाचे आकलन होऊ शकेल .

**6) ग्रामिण भागातील युवक वर्ग :-** ग्रामिण भाग हे सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र राहिलेले आहे . देशातील वाढते बेरोजगाराचे प्रमाण कमी करून स्वावलंबी जीवनाचा मंत्र ग्रामीण भागातील युवकांना देण्यासाठी ग्रामीण भागातील युवकांना प्रशिक्षण देवून सहकार क्षेत्राच्या प्रभावाखाली आणण्याची गरज आहे . ग्रामीण भागातील युवक वर्गास सहकार शिक्षण प्रशिक्षण दिल्यास ग्रामीण भागातील युवकांचा सहकार चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल . यातून प्रेरणादेखील मिळू शकेल .

**7) महाविद्यालयीन विद्यार्थी :-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयांतर्गत सहकाराची ओळख होते . ज्या महाविद्यालयात सहकार विषय स्वतंत्रपणे अभ्यासात नसेल त्या ठिकाणी सहकार हा भाग ओझरता शिकविण्यात येतो . सहकार चळवळीचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील भूमिका सैध्दांन्तिक दृष्टया शिकवण्यापेक्षा प्रात्यक्षित स्वरूपात सहकाराचे प्रशिक्षण देवून शिविल्यास त्याचा दृष्टिकोन सुस्पष्ट होण्यास मदत मिळते .

## सारांश

वरील विश्लेषनावरून आपणास असे म्हणता येईल, की सहकार शिक्षण ही एक काळाची गरज आहे . सहकार शिक्षण मिळाल्यामुळे सहकार चळवळ अधीक बळकट होवू शकते . तसेच सहकारी संस्थामधील,संबधितांना सहकारामधील शिक्षण दिले गेल्यास सहकारी संस्थांमधील भ्रष्टाचाराला आळा बसून सहकारी संस्था सुस्थितीत चालतील हे लक्षात येते . त्यामुळे सहकारी शिक्षणाचा विकास होणे गरजेचे आहे . तसे पहिले तर सध्याच्या परिस्थितीत सहकारी शिक्षणास थोडयाफार प्रमाणात विकास झालेला दिसून येतो . त्याचप्रमाणे सहकार चळवळ व सहकारी संस्था यांच्या बळकटीसाठी सहकार क्षेत्रमधील कार्यकर्त्यांना तसेच कामगारांना, पदाधिका-यांना सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण देणे गरजेचे आहे . तसेच सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण कोणासाठी आवश्यक आहे हे ही आपणास माहीत होते .

## संदर्भ

1) सहकार- डॉ . गं . वि . कायंदे-पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-13
2) सहकार- प्रा . के . एम भोसले, प्रा . डॉ . वी . एच दामजी, फडके प्रकाशन, कोल्हापूर .
3) सहकाराच विकास - प्रा . मोहन सराफ व प्रा . रूपा शहा, फडके प्रकाशन, कोल्हापूर .



**प्रा . डॉ . साळवे जे . एम**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख मु . सा . काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर ता . बारामती जि-पुणे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com